# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 24/12/2022 (शनिवार) दुपार

---

## गैरकायदयाची मंडळी जमवून विनयभंग करणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

**१) पो.स्टे. पारशिवनी :–** अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील मौजा नयाकुंड येथे दिनांक २३/१२/२०२२ चे ०६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी नामे– 1) सौ. उषा लक्ष्मण ठाकरे २) भारत ठाकरे ३) आशा ठाकरे ४) तनवी ठाकरे ५) अस्मीता ठाकरे सर्व रा नयाकुंड ता. पारशिवनी हे एकाच मोहल्ल्यात अमोरासमोरील घरात राहत असुन यातील घटना वेळी व ठिकाणी फिर्यादीने उधार दिलेले ५००/– रू परत मागितल्याचे कारणावरून आरोपीतांनी फिर्यादी व तिचे मुलीला अश्लील भाषेत शिवीगाळी करून गैरकायदयाची मंडळी जमवुन विटेने मारहाण करून केस ओढताण करून फिर्यादीची मुलगी तिला लज्जास्पद वाटेल असे वर्तन करून विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम १४३, १४७, १४९, २९४, ३५४, ३२३, ५०६ भांदवि. सह कलम १३५ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पळनाटे ७३८७०८६१७८ करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी :–** अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील मौजा नयाकुंड येथे दिनांक २३/१२/२०२२ चे ०७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी नामे– १) मिरा मनोहर काळसर्पे २) लता काळसर्पे ३) मनोहर काळसर्पे ४) पुजा काळसर्पे ५) अस्मीता काळसर्पे सर्व रा. नयाकुंड ता. पारशिवनी हे एकाच मोहल्ल्यात अमोरासमोरील घरात राहात असुन यातील घटना वेळी व ठिकाणी फिर्यादीची जाऊ नामे– उषा ठाकरे हिच्या सोबत मिरा काळसर्पे ही पैशाच्या कारणावरून झगडा भांडण करत असता फिर्यादीने जाऊला ''कशाला भांडण करत आहे घरी चला'' असे म्हटले असता आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवून फिर्यादीचे केस धरून अश्लिल भाषेत शिवीगाळ करून हातबुक्क्याने मारपीट करून फिर्यादीची तिला लज्जास्पद वाटेल असे वर्तन करून तिचा विनयभंग केल्याने व फिर्यादीच्या मुलीला शिवीगाळ करून ढकल दुकलकेले व जिवाने मारण्याची धमकी देऊन जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम १४३ १४७ १४९ २९४ ३५४ ३२३.५०६ भादवी सह कलम १३५ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पळनाटे मो. नं. ७३८७०८६१७८ करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर